| | |
|---|---|
| | **किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २९/२०२६.**<br>श्री. सादु जिवबा मस्कर,वगैरे<br>विरुध्द<br>कोणीही नाही |

## निशाण १ खालील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ प्रमाणे वारसा दाखला मिळणेसाठी केला आहे.

०२. **अर्जदारांचे थोडक्यात कथन-**

अर्जदार क्र. १ हे मयत कै.धोंडुबाई तुका पाटील हिचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. २ ते ५ हे धोंडुबाई हिचा दुसरा सख्खा भाऊ कै.महादु जिवबा मस्कर यांचे सरळ वारस असून अर्जातील नमुद मिळकतीचे मालमत्ता पत्रकी महादुचे जागी वारसा हक्काने त्यांचे नावाची नोंद झाली आहे. तसेच अर्जदार क्र. ६ व ७ हे मयत कै. धोंडुबाई हिची बहिण कै. अकुताई बापू पाटील हिचे सरळ वारस असून अर्जातील नमुद मिळकतीचे मालमत्ता पत्रकी अकुताई चे जागी वारसा हक्काने त्यांचे नावाची नोंद झाली आहे. कै.धोंडुबाई तुका पाटील व तुका उर्फ तुकाराम कृष्णा पाटील यांना त्यांचे विवाह संबंधातून कोणतेही अपत्य नाही. अर्जदार हेच कै. धोंडुबाई तुका पाटील यांचे खाली नमुद केलेले मिळकतीस कायदेशीर वारस असुन अन्य कोणीही वारस नाहीत.

०३. अर्जदार यांनी सदरचा वारसा दाखला हा मौजे कोतोली,ता.पन्हाळा जिल्हा कोल्हापूर येथील नगर भुमापन (सि.स.क्र) ५०६ चे एकूण क्षेत्र १५५ चौ.मी. पैकी धोंडुबाई तुका पाटील यांचे नावे मालमत्ता पत्रकी नोंद असलेली मिळकत तसेच नगर भुमापन (सि.स.क्र) ४०७ चे एकूण क्षेत्र १५५.९० चौ.मी. पैकी धोंडुबाई तुका पाटील हिचे नांवे मालमत्ता पत्रकी नोंद असलेल्या मिळकतीस अर्जदार यांचे नावे वारसा दाखला मिळणेसाठी अर्ज केला आहे.

०४. सदर मिळकत ही वाडवडीलार्जीत मिळकत असलेने सदर मिळकतीबाबत मयत धोंडुबाई तुका पाटील व तुका उर्फ तुकाराम कृष्णा पाटील यांना त्यांचे विवाह संबंधातून कोणतेही अपत्य नसलेने त्यांना हिंदु वारसा कायद्यातील तरतुदीनुसार सदर मिळकतीस प्रस्तुत अर्जदार हेच एकमेव वारस आहेत.

०५. अर्जाच्या अनुशंगाने नि.७ जाहिरनामा मयताचे घरावर तसेच एक प्रत गाव चावडीचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली असून बेलीफ अहवाल ऑन लाईन सामील करणेत आला. सदर कामी इतर कोणीही हजर होवून हरकत घेतलेली नाही. तसेच अर्जाच्या अनुषंगाने नवसंदेश या वृत्तपत्रात दिनांक १९.०५.२०२६ रोजी जाहीरनामा प्रसिध्द केला. सदर जाहीर नोटीस दैनिक अंकाची प्रत ऑन लाईन निशाणी क्र.१२ वर हजर केली आहे. जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर आजपर्यंत कोणीही अर्जदारच्या अर्जास हरकत नोंदवली नाही.

०६. अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार क्र. १ सादु जिवबा मस्कर याने स्वतःचे सरतपास शपथपत्र ऑनलाईन निशाणी क्र.१७/क वर दाखल केले. सरतपासामध्ये अर्जदार यांनी अर्जातीलच मजकुराचा पुर्नरुच्चार केला. तसेच अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.२ सिंधु महादेव मस्कर हिचे सरतपास शपथपत्र ऑनलाईन निशाणी क्र.१८/क वर, साक्षीदार क्र. ३ पांडुरंग चंद्रकांत पाटील याचे सरतपास शपथपत्र ऑनलाईन निशाणी क्र.१९/क वर दाखल केले. सदर तिनही साक्षीदारांनी अर्जदार क्र. १ चे कथनाला पुष्टी दिली असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत त्यामुळे मयत धोंडुबाई तुका पाटील यांचे अर्जदार हे वारस असलेबाबत दाखला देणेत यावा असे कथन केले आहे.

०७. अर्जदाराने त्यांचे कथनाचे पृष्टर्थ मयत द्रौपदी उर्फ धोंडुबाई तुकाराम पाटील हिचा मृत्यू दाखल्याची प्रमाणीत केलेली प्रत ऑनलाईन अनुक्रमांक निशाणी क्र.१३/क वर हजर केली. तसेच ऑनलाईन अनुक्रमे निशाणी क्र. १४ ते १६ वर मयत तुकाराम कृष्णा पाटील, आक्काताई बापू पाटील व महिपती बापु पाटील यांच्या मृत्यु दाखल्याची प्रत हजर केली. तसेच ऑनलाईन_अर्जदार क्रमांक १ ते ७ यांच्या आधार कार्डच्या झेरॉक्स प्रती दाखल केल्या. अर्जदार यांनी निशाणी २० ला तोंडी पुरावा संपलेबाबतची पुरसीस दाखल केली.

०८. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराने दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जातील सर्व कथनांचा पुर्नउच्चार केल्याचे दिसून येते. तर निशाणी क्र.१३ वरील मृत्यू दाखल्यावरुन द्रौपदी उर्फ धोंडुबाई तुकाराम पाटील ही मयत झाल्याचे दिसून येते. तसेच ऑनलाईन अनुक्रमे निशाणी क्र.१४ ते १६ वरील मृत्युदाखल्यानुसार मयत तुकाराम कृष्णा पाटील, आक्काताई बापू पाटील व महिपती बापु पाटील हे देखील मयत असल्याचे दिसून येते. तसेच दाखल केलेल्या वर्तमानपत्रावरुन जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिसून येते. परंतु सदर जाहीर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द करुनही प्रस्तुत प्रकरणात कोणी हजर झाले नाही. अर्जदार यांनी ते मयत धोंडुबाई तुका पाटील हिचे वारस असलेबाबत वारसा दाखला मागणेसाठीचा अर्ज

केलेचे स्पष्ट होते. एकंदरीत अर्जाचा विचार करता धोंडुबाई तुका पाटील ही मयत झाली असून तिला अर्जदार हेच सरळ व कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, सदरचा अर्ज मंजूर करण्यास कोणताही अडथळा येत असल्याचे दिसत नाही. सबब, अर्ज विनंतीनुसार मंजूर करण्यात येतो व त्यामुळे मी  खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## **आ दे श**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार  हे  मयत  धोंडुबाई तुका पाटील हिचे सरळ कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला देण्यात  येतो.

०३. प्रस्तुतचा वारसा दाखला अर्ज हा अर्जात नमुद कारणासाठी मंजूर करण्यात येतो.

०४. प्रस्तुतचा वारसा दाखला हा योग्य त्या कोर्ट फी स्टॅम्प भरुन घेवून देण्यात यावा.

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.07.07 16:54:29 +0530

ठिकाण -पन्हाळा
दिनांक- ०७.०७.२०२६.

एस.व्ही.जंगमस्वामी,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,पन्हाळा,
जिल्हा कोल्हापूर